# कॅम्पस इंटरव्ह्यूमधून ३८७ विद्यार्थ्यांना संधी

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक



के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेज व रिसर्च सेंटरच्या तब्बल ३८७ विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूमधून नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी मिळाली आहे. त्यातील दोन विद्यार्थ्यांना सात लाखांचे तर ३५ विद्यार्थ्यांना पाच लाखाचे पॅकेज मिळाले आहे. ही माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली.

**के. के. वाघ कॉलेजचा वरचष्मा**

नोकरीच्या संधींबाबत वर्षभराचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, सुमारे पन्नास कंपन्यांनी केकेवाघ इंजिनीअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रात क्रॉम्प्टन ग्रीव्हज्, टीसीएस, एल अँण्ड टी इन्फोटेक, केपीआयटी टेक्नॉलॉजी पुणे, एनव्हीडीया, पर्सिस्टन्स सिस्टीम लि., फीम आय क्यू, एरिज या कंपन्यांमार्फत कॅम्पस इंटरव्ह्यूची प्रक्रिया पार पडली होती. यांत १२५ इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांची आणि २६ एम.सी.ए.च्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांची सहा महिन्यांच्या इंटर्नशीपसाठी निवड झाली.

शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रात जेएसडब्ल्यू स्टील्स, आयबीएम, ऋषभ इन्स्टुमेंट्स, इन्फोसिस, व्होडाफोन, ब्रीजस्टोन, विप्रो टेक्नॉलॉजी, भारतीय सैन्य दल, ईएसडीएस, डाटामॅटिक्स, नेटविन इन्फोसोल्युशन्स, विनजित टेक्नॉलॉजी, फ्लोर डॅनिएल, महिंद्रा अँण्ड महिंद्रा, बॉश आदी कंपन्यांनी इंजिनीअरिंग, एमबीए आणि एमसीएच्या मुलांचे कॅम्पस इंटरव्ह्यू घेऊन सुमारे २७० विद्यार्थ्यांची निवड केली. असे दोन्ही सत्रात मिळून एकूण ३८७ विद्यार्थ्यांची निवड वर्षभरात कॅम्पस इंटरव्ह्युत झाली. यांबरोबरच मॅकेनिकल आणि कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीतील काही बहुराष्ट्रीय कंपन्या कॅम्पस इंटरव्ह्यू घेत असून, या शैक्षणिक वर्षात ४०० पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळतील असा विश्वास प्राचार्य नांदूरकर यांनी व्यक्त केला आहे.

## केपीआयटी कंपनीशी सामंजस्य करार

के. के. वाघ शिक्षणसंस्थेने पुण्याच्या केपीआयटी टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड या प्रसिद्ध सॉफ्टवेअर कंपनीबरोबर शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. त्याअंतर्गत शिक्षक व विद्यार्थ्यांना केपीआयटी कंपनीमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल व त्यातून विद्यार्थ्यांना नोकरीच्या अधिकाधिक चांगल्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या कराराच्या माध्यमातून प्रशिक्षण, रोजगार संधींसग संयुक्त संशोधन प्रकल्पदेखील सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना डिग्रीच्या शेवटच्या वर्षात तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## परदेशातील कंपन्यांमध्येही मिळाली संधी

के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये झालेल्या या वर्षीच्या निवडीमध्ये काही विद्यार्थ्यांची निवड ही थेट परदेशातील कंपन्यांमध्ये झाली आहे. त्यातील एम. सी. ए.ची प्राची काकळीज या विद्यार्थिनीची ऑस्ट्रेलियाच्या नामांकित कंपनीत निवड झाली. केमिकल शाखेतील अजिंक्य देशमुख व नीलेश पगारे या विद्यार्थ्यांची निवड दुबईच्या कन्सल्टंट कंपनीने पाच लाखांचे पॅकेज देऊन केली आहे. फ्लोर डॅनियल या कंपनीने मॅकेनिकल शाखेच्या तेज दुबे व कुणाल मोदी या विद्यार्थ्यांना साडे चार लाखाचे पॅकेज देऊ केले आहे. त्याचबरोबर कॉम्प्युटर शाखेतील अस्मिता गौतम व मुकेश भारसाखळे या विद्यार्थ्यांची एनव्हिडीया या कंपनीने सात लाखांच्या भक्कम वार्षिक पॅकेजसह केली आहे.

| कंपनीचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| एनव्हिडीया | ०२ |
| टीसीएस | २७ |
| क्रॉम्प्टन ग्रीव्हज् | १० |
| जे.एस.डब्ल्यू.टील्स | २३ |
| केपीआयटी टेक्नॉलॉजी | ४३ |
| फीन आयक्यू | ४४ |
| एल अँण्ड टी इन्फोटेक | २३ |
| इन्फोसिस | १७ |
| पर्सिस्टन्ससिस्टीम | १४ |
| एरीस | १८ |
| महिंद्रा अँण्ड महिंद्रा | २५ |